मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 30 मे 2024 | पान- 1

# निगडी ते पिंपरी मेट्रोच्या कामाला सुरुवात

## तीन वर्षांत 4.51 किलोमीटर मार्गिकेचे काम पूर्ण होणार : निगडी ते स्वारगेट प्रवास होणार सुखकर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना स्वारगेटपर्यंत विनासायास प्रवास पुढील काही वर्षात करता येणार आहे. सध्या पिंपरीहून सिव्हिल कोर्टापर्यंत मेट्रोची सेवा सुरू असून पिंपरी ते भक्ती शक्ती निगडी चौकापर्यंत विस्तारित मेट्रोसाठी खोदकामाला सुरुवात झाली आहे. तीन टप्प्यांत हे काम पूर्ण होणार आहे. काम पूर्ण झाल्यावर प्रवाशांचे निगडी प्राधिकरणातून मेट्रोने प्रवास करण्याचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे.



निगडीतील भक्ती-शक्ती चौकात मेट्रोच्या खोदाई या कामाला सुरुवात करण्यात आली असून भक्ती-शक्ती चौक आणि पवळे पुलाजवळ बॅरिकेटिंग करण्यात आले आहे. महामेट्रोकडून भक्ती-शक्तीसह मार्गावरील रस्त्याचे सुरुवातीला माती परीक्षण करून ले-आउट तयार करणार आहे. त्यानंतर पिलर बांधण्याचे काम सुरू होणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडी या विस्तारित मार्गाला केंद्र सरकारने २३ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यता दिली.

पुणे महामेट्रोने पिंपरी-चिंचवड महापालिका ते निगडीपर्यंतच्या मार्गाच्या विस्तारीकरणाची निविदा निविदा प्रक्रियेचे काम पूर्ण झाल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाइन ६ मार्च रोजी या विस्तारित मार्गाचे भूमिपूजन केले होते. या मार्गाची लांबी ४.५१ किलोमीटर असून या मार्गिकेचा खर्च ९१०.१८ कोटी इतका आहे. या विस्तारित मार्गाचे काम तीन वर्षात पूर्ण करण्याचे महामेट्रोचे नियोजन आहे.

### निगडीपर्यंत मेट्रोची नागरिकांची मागणी

पुणे महामेट्रो मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यात मोरवाडी पिंपरी ते फुगेवाडीपर्यंत काम करण्यात आले. त्यानंतर सिव्हिल कोर्टापर्यंत मार्ग पूर्ण करण्यात आला. तेथून पुढे स्वारगेटपर्यंत मार्ग पूर्ण करण्यात आला.

फुगेवाडी ते पिंपरी या मार्गावर ६ मार्च २०२२ रोजी तर फुगेवाडी ते सिव्हिल कोर्ट स्थानक मार्गावर ऑगस्ट २०२३ प्रवासी वाहतूक सुरू झाली. मात्र, स्वारगेट ते पिंपरी महापालिका हा मार्ग पुढे निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत वाढवावा, अशी नागरिकांकडून सातत्याने मागणी केली जात होती.

### चार स्थानकांचे अंतर

» या मार्गावर चिंचवड, आकुर्डी, निगडी प्राधिकरण आणि भक्ती-शक्ती चौक या स्थानकांचा समावेश असणार आहे. त्यात महापालिका ते चिंचवड स्थानकातील अंतर १.४६३ किलोमीटर, चिंचवड ते आकुर्डी स्थानकांतील अंतर १.६५१ किलोमीटर, आकुर्डी ते निगडी स्थानकांतील अंतर १.०६२ किलोमीटर आणि निगडी स्थानक ते भक्ती शक्ती चौक स्थानकांतील अंतर ९७५ मीटर असणार आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिका ते निगडीदरम्यान मेट्रो मार्गिकेसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आरव्हीएनएल कंपनीला मेट्रोचे काम देण्यात आले आहे. पुढील ३६ महिन्यात हे काम पूर्ण करणे अपेक्षीत असून बॅरिकेडींच आणि इतर प्राथमिक कामांना सुरवात झाली आहे.
>
> - हेमंत सोनवणे, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो.

# प्रवासी महिलेचा विनयभंग करणारा ओला कॅबचालक गजाआड

## कॅबमध्ये बसलेल्या प्रवासी महिलेचा विनयभंग : कॅब चालकास देहूरोड पोलिसांकडून अटक

**पिंपरी | प्रतिनिधी**

कॅबमध्ये बसलेल्या प्रवासी महिलेचा विनयभंग प्रकरणी फरार असलेल्या कॅब चालकास देहूरोड पोलिसांनी अटक केली. विनयभंगाची घटना १४ मे रोजी देहूरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. त्यानंतर आरोपी आपले अस्तित्व लपवून फिरत होता. राहुल पांडुरंग म्हस्के (रा. थेरगाव) असे अटक केलेले आरोपीचे नाव आहे.

पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ मे रोजी एक महिला कोरेगाव पार्क येथे तिच्या मित्राच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी जात होती. महिलेने कॅब बुक केली. त्यानंतर महिला राहुल याच्या कॅब (MH 14/LB4133) मधून कोरेगाव पार्क येथे जात होती. राहुल याने कार कोरेगाव पार्क येथे न नेता देहूरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत आणली. तिथे त्याने महिलेच्या एकटेपणाचा फायदा उचलून महिलेशी गैरवर्तन करत तिचा विनयभंग केला. याबाबत महिलेने देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.



गुन्हा दाखल झाल्यापासून कॅब चालक राहुल हा आपले अस्तित्व लपवून पुणे शहरात वावरत होता. त्याच्याबाबत कोणती माहिती नसताना देहूरोड पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे त्याचा शोध घेत त्याला अटक केली. या गुन्ह्यामध्ये पोलिसांनी त्याची कार देखील जप्त केली आहे.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पी टी खणसे, पोलीस अंमलदार प्रशांत पवार, बाळासाहेब विधाते, संतोष जाधव, सुनील यादव, किशोर परदेशी, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडिक, निलेश जाधव, मोहसीन अत्तार, युवराज माने, शुभम बावनकर, स्वप्निल साबळे यांनी केली.

# ‘ससून’मध्ये दररोज 24 रुग्णांचा मृत्यू!

## रुग्णालयात गेल्या वर्षभरात 8 हजार 875 रुग्णांचा मृत्यू : प्रशासनाचे रुग्णसेवेकडे दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

ससून सर्वोपचार रुग्णालयात दिवसाला २४ रुग्णांचा मृत्यू होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. रुग्णालयात गेल्या वर्षभरात ८ हजार ८७५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयात गैरप्रकार वाढत असून, प्रशासनाचे रुग्णसेवेकडे दुर्लक्ष होत आहे.




राज्यातील सरकारी रुग्णालयांत गेल्या वर्षी झालेल्या रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी माहिती अधिकारांतर्गत सामाजिक कार्यकर्ते संतोष घोलप यांनी मागविली होती. त्याला सार्वजनिक आरोग्य विभागाने उत्तर दिले आहे. त्यात २०२३ मध्ये सर्व सरकारी रुग्णालयांत झालेल्या रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी देण्यात आली आहे. त्यात राज्यात सर्वाधिक ८ हजार ८७५ मृत्यू ससून रुग्णालयात झाल्याची नोंद आहे. याबाबत घोलप म्हणाले, ‘ससूनचे प्रशासन रुग्णांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा देण्याऐवजी भ्रष्टाचारावर भर देत आहेत. आता तर रुग्णालयातील दोन डॉक्टरांना अटक झाली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याने या प्रकरणी विशेष तपास पथक नेमून चौकशी करावी. या प्रकरणातील सत्य बाहेर यायला हवे.’

‘ससून रुग्णालयाची सध्या रुग्णशय्येची क्षमता सुमारे १८०० आहे. रुग्णालयात दाखल रुग्णांची संख्या ही नेहमीच क्षमतेपेक्षा जास्त असते. रुग्णालयात आंतररुग्ण विभागात दररोज सुमारे १८० रुग्ण दाखल होतात. याच वेळी बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या अडीच हजारांहून अधिक आहे. दररोज रुग्णालयातून सुमारे १६० रुग्णांना घरी सोडले जाते. रुग्णालयात दररोज सरासरी २४ रुग्णांचा मृत्यू होत आहे,’ अशी माहिती रुग्णालयातील सूत्रांनी दिली.

ससून रुग्णालय हे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वांत मोठे सरकारी रुग्णालय आहे. यामुळे अनेक जिल्ह्यांतून रुग्ण ससून रुग्णालयात पाठविले जातात. त्याचबरोबर पुणे शहर आणि जिल्ह्यांतील खासगी रुग्णालयांतूनही गंभीर रुग्ण ससूनमध्ये पाठविले जातात. ससूनमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांपैकी थेट दाखल होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण ४० टक्के आहे. इतर रुग्णालयांतून दाखल होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण ६० टक्के असून, त्यातील निम्मे रुग्ण हे ४८ तासांत दगावतात, असेही सूत्रांनी नमूद केले.

> “ अनेक खासगी रुग्णालये रुग्णाची स्थिती बिघडल्यानंतर अथवा त्याच्याकडील पैसे संपल्यानंतर त्याला ससूनमध्ये पाठवितात. त्यामुळे असे रुग्ण दाखल केल्यानंतर ७२ तासांत त्यांचा मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक दिसते. रुग्णालयात वर्षभरात किती मृत्यू झाले यापेक्षा नेमका मृत्यूदर किती आहे, हे पाहायला हवे.
>
> **- डॉ. दिलीप म्हैसेकर, संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय.**

# ससून रुग्णालयातील डॉ. अजय तावरेंच्या जीवाला धोका

## आर्यन खान प्रकरणात प्रभाकर साहिलची हत्या : उबाठा गटाच्या नेत्या सुषमा अंधारे

**पुणे | प्रतिनिधी**

“४ जून रोजी देशातील सर्वात मोठ्या निवडणुकीचा निकाल लागत आहे. तत्पूर्वी दोन दिवस पोलिसांचा मोठा फौजफाटा निकालासाठी तैनात असेल, असा परिस्थितीत मला आणखी ताण वाढवायचा नाही. त्यामुळे पुणे पोर्श अपघात आणि प्रशासनाची कुचराई या प्रकरणी ४ जून नंतरच बोलेन”, अशी भूमिका मांडत असताना शिवसेना उबाठा गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी ससून रुग्णालयाच्या न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हरनोळ यांच्या जीवाला काही बरं-वाईट होऊ नये, अशी चिंता व्यक्त केली आहे.



पुण्यातील कल्याणीनगर भागात भरधाव पोर्श कारमुळे दोघांचा मृत्यू झाला. नामांकित बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने हे कृत्य केल्याचा आरोप असून त्यानंतर गुन्हा लपविण्यासाठी प्रशासनाच्या मदतीने सारवासारव करण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी पहिल्या दिवसापासून लावला होता. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनीही यातील काही तथ्ये लोकांसमोर मांडली. त्यानुसार येरवडा पोलीस ठाण्यातील दोन पोलिसांना निलंबित केले आहे, तर ससून रुग्णालयातील डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हरनोळ यांनी आरोपीचे रक्तचाचणीचे नमुने बदलल्याबद्दल त्यांना अटक केली आहे.

### आर्यन खान प्रकरणात प्रभाकर साहिलची हत्या

या सर्व विषयावर बोलण्यासाठी सुषमा अंधारे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. त्या म्हणाल्या, ससूनमधील दोन्ही डॉक्टरांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याची जबाबदारी सरकारची आहे. वर्षभरापूर्वी घडलेल्या अनिल जयसिंघानिया प्रकरणाचा हवाला अंधारे यांनी दिला. तसेच शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान आणि समीर वानखेडे प्रकरणातही केपी गोसावीचा अंगरक्षक प्रभाकर साहिल हा पुढे जाऊन महत्त्वाचा साक्षीदार बनला होता. प्रभाकरच्या जीवाला धोका असल्याचे नवाब मलिक म्हणाले होते. २ एप्रिल २०२२ रोजी प्रभाकर साहिलचा संशयास्पद मृत्यू झाला. ललित पाटील प्रकरणातही पुढे काय झाले? याची माहिती बाहेर आलेली नाही.

पोर्श अपघात प्रकरणात डॉ. तावरेंनी धमकीवजा इशारा दिला आहे. माझ्याकडे बरीच नावे आहेत, मी कुणालाही सोडणार नाही, असे डॉ. तावरे म्हणाले आहेत. अशावेळी डॉ. तावरे यांची सुरक्षितता महत्त्वाची ठरते. कारण पोर्श कार अपघातात इतके बडे प्रस्थ गुंतू शकतात, रक्ताचे नमुने बदलले जाऊ शकतात, पिझ्झा खाऊ घालत १२ तासात जामीन दिला जाऊ शकतो, चालक बदलण्याचा प्रयत्न होऊ शकतो, तर डॉ. तावरे यांच्या जीवाला धोका का होऊ शकत नाही? अशी शंका सुषमा अंधारे यांनी व्यक्त केली.

### ससूनच्या कर्मचाऱ्यांचीही होणार चौकशी

ससून सर्वोपचार रुग्णालयातील दोन डॉक्टरांना कल्याणीनगर अपघातातील अल्पवयीन आरोपीच्या रक्त नमुन्याची अदलाबदल केल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी चौकशीसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने नेमलेल्या समितीने मंगळवारी ससूनमधील अधिष्ठात्यांपासून आपत्कालीन कक्षातील परिचारिकांसह कर्मचाऱ्यांची चौकशी केली.

समितीने सुरुवातीला आपत्कालीन विभागाची पाहणी केली. त्यानंतर रक्त नमुन्यामध्ये अदलाबदल झाली त्या वेळी नेमके काय घडले, याबाबत चौकशी सुरू केली. त्यात घटना घडली त्या दिवशी आपत्कालीन विभागात कार्यरत असलेल्या परिचारिका, कर्मचारी, डॉक्टर, तंत्रज्ञ यांची चौकशी करण्यात आली.

### कुणाचं जीव घेणं सोप्प काम नाही - संजय शिरसाट

» सुषमा अंधारे यांच्या टीकेला शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, “हे महाराष्ट्र राज्य आहे. कुणाचाही जीव घेणे सोपे काम नाही. त्यांना जर काही शंका असेल तर पोलीस आयुक्त त्याबाबत काळजी घेतील.”

# पवना धरणात 33 दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा

## पिंपरी चिंचवडकरांवर पाण्याचे मोठे संकट : पुसाणे, आढले, मळवंडी धरणांनी गाठला तळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील शेती ही धरणातील पाण्यावर अवलंबून आहे. पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना धरणात ३३ दिवस पुरेल इतकेच पाणी शिल्लक आहे. तर तालुक्यातील पुसाणे, आढले आणि मळवंडी धरणातील पाणीसाठा शून्य टक्क्यांवर आला आहे. जर यंदाचा पावसाळा लांबला तर मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांसह पिंपरी चिंचवडकरांवर पाण्याचे मोठे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

मावळ तालुक्यात पावसाळ्यात जोरदार पाऊस पडतो. हा पाऊस खरीप हंगामातील भात शेतीसाठी पुरक असा आहे. मात्र त्यानंतर रब्बीच्या पिकासाठी शेतकऱ्यांना धरणातील पाण्यावर अवलंबून रहावे लागते. तसेच अनेक शेतकऱ्यांनी ऊस लावला असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. दरवर्षी परतीचा पाऊस चांगला होत असल्याने ऑक्टोंबर महिन्यात धरणे १०० टक्के भरलेली असतात.

त्यामुळे सर्व धरणातील पाणीसाठा शेतकऱ्यांना वर्षभर पुरतो. मात्र गेल्यावर्षी अपेक्षित परतीचा पाऊस झालेला नाही. त्यामुळे धरणातील पाण्याचा ऑगस्ट महिन्यात वापर होऊ लागला. तसेच यंदा उन्हाळा जास्त असल्याने धरणातील पाण्याचे बाष्पीभवनही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे मावळ तालुक्यातील धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होऊ लागले आहे.

मावळ तालुका हा पाणीदार तालुका म्हणून ओळखला जात आहे. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये येथील भूजल पातळी तब्बल एक फूटाने खोल गेली आहे. त्यामुळे उन्हाळ्यात बोअरवेल आणि विहिरींचे पाणी आटले आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी धरण आणि नदीच्या पाण्यावरच अवलंबून राहावे लागते.

मात्र पुसाणे, आढले, मळवंडी या धरणांना लाभक्षेत्र अधिक असल्याने शेतीसाठीही या पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. या धरणातील पाण्याची पातळी जरी कमी झाली असली तरी कासारसाई धरणात सध्या पवनेपक्षा अधिक म्हणजे ३० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मात्र पवना धरणाच्या तुलनेत कासारसाई धरणाची साठवण क्षमता अत्यंत कमी आहे.



> पवना धरणात सध्या २५.१५ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. हा पाणीसाठा ३३ दिवस म्हणजे ३० जून पर्यंत पुरेल, असे नियोजन आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत दोन टक्क्यांनी पाणीसाठा कमी आहे. तृयामुळे शेतकरी व नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा.
> - रजनीश बारिया, शाखाधिकारी, पवना धरण.

# भोसरीत दहशतवाद विरोधी पथकाची मोठी कारवाई

## बनावट कागदपत्रांसह बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या 5 बांगलादेशी नागरिकांना अटक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड दहशतवाद विरोधी पथकाने बनावट कागदपत्रांसह पाच बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. बनावट कागदपत्रांसह भारतात बेकायदेशीररित्या राहणाऱ्या ५ जणांना दहशतवाद विरोधी शाखेकडून अटक करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी भागात ही कारवाई करण्यात आली आहे.

यात पोलिसांनी शमीम नुरोल राणा, राज उर्फ सम्राट सदन अधिकारी, जलील नरू शेख उर्फ जलील नूर मोहम्मद गोलदार, वसीम अजीज उलहक मंडल उर्फ वसीम अजीऊल हक हिरा, आझाद शमशुल शेख उर्फ अबुल कलाम शमशुद्दिन फकीर या पाच बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. तसंच पोलिसांकडून त्यांना बनावट कागदपत्र बनवून देणाऱ्या दोघांवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी या पाच बांगलादेशी नागरिकांकडून अकरा हजार रुपये किमतीचा मोबाईल, एअरटेल कंपनीचं सीम आदी साहित्य जप्त केलं आहे. त्यांच्यावर परकीय नागरिक कायदा पारपत्र अधिनियम आणि भारतात प्रवेश करण्याचा नियम यानुसार गुन्हे दाखल केले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, आरोपी हे बांगलादेशी नागरिक आहेत. ते भोसरी परिसरात अनेक दिवसांपासून राहत होते. त्यांच्याकडे कोणताही अधिकृत परवाना नव्हता. वैध कागदपत्रांशिवाय ते इथे राहत होते. त्यांनी इथे रहाण्यासाठी बेकायदेशीररित्या बनावट भारतीय आधार कार्ड, जन्म दाखला आणि शाळा सोडल्याचा दाखला, तसंच पासपोर्ट बनवून घेतला होता.

पाच बांगलादेशी तरुण अशाप्रकारे भोसरीत राहत असल्याची माहिती दशतवाद विरोधी पथकाला माहिती मिळाली. माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी भोसरी परिसरात त्यांच्या ठिकाणावर धाड टाकत ही कारवाई केली आहे. पोलिसांनी घटनस्थळवरून पाच बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



### “बांगलादेशी घुसखोरांच्या मुसक्या आवळा...” : आमदार महेश लांडगे

» दहशतवाद विरोधी शाखा आणि भोसरी पोलिसांनी पाच संशयितांना अटक केली असली, तरी शहरातील काही भागांमध्ये अनेक ठिकाणी बनावट आधारकार्ड, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला व पासपोर्टच्या आधारे भारतीय नागरिक असल्याचे भासवून घुसखोर वास्तव्य करीत आहेत. शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने अशा घुसखोरांच्या वेळीच मुसक्या आवळाव्यात, अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, राज्य सरकारचं आगामी विधिमंडळाचं अधिवेशन येत्या काही महिन्यात होणार आहे. या अधिवेशनात बांगलादेशी घुसखोर व पिंपरी-चिंचवडची सुरक्षा” या संवदेनशील मुद्यावर प्रभावीपणे भूमिका मांडणार असल्याचं मत देखील महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

### बनावट कागदपत्रांसह वास्तव्य

» पिंपरी-चिंचवड पोलिसांनी बांगलादेशी घुसखोरांवर पुन्हा एकदा कारवाई केली आहे. पाच घुसखोर बांगलादेशींना अटक केली असून, त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड, पासपोर्ट, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला मिळाला आहे. भोसरी येथील शांतीनगरमध्ये ही कारवाई करण्यात आली आहे..

# बिबट निवारा केंद्राची क्षमता तिप्पट

## मंत्रालयातील बैठकीत निर्णय : विशेष बिबट्या संरक्षण दलाची निर्मिती करणार

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील वाढत्या बिबट हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर बिबट निवारा केंद्राचा विस्तार करून बिबट्यांची क्षमता संख्या तिप्पट म्हणजेच 150 इतकी करण्यात येणार आहे. बिबट्यांना आवर घालण्यासाठी 300 पिंजरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी जुन्नर तालुक्यात विशेष बिबट्या संरक्षण दलाची निर्मिती करण्यात येणार असल्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

यावेळी माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशिल शेरकर, भाजप नेत्या आशा बुचके यांच्यासह तालुक्यातील काही प्रमुख नेते आणि वन विभाग तसेच इतर सबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



### शेतकऱ्यावरीलगुन्हे मागे घेणार

» बिबट्याने मानवावर केलेल्या हल्ल्यामुळे शेतकरी आणि वनविभागाचे अधिकारी यांच्यात वाद झाला होता. त्यातून शेतकऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे रद्द करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गुन्हे मागे घेतले जातील, असा निर्णय मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

जुन्नर तालुक्यातील बिबट्यांची संख्या व मानवावरील वाढते हल्ले याचे गांभीर्य लक्षात घेऊन बिबटे सरसकट पकडून इतरत्र हलविण्याचे ठरवले आहे. यासाठी अधिकचे लागणारे पिंजरे येत्या दोन महिन्यांमध्ये 300 पिंजरे उपलब्ध करून दिले जाणार आहे.

वन विभागात मानव बिबट संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे. बिबट्यांच्या हल्ल्यांच्या गंभीर घटना वाढत आहेत. बिबट्यांची वाढणारी संख्या लक्षात घेऊन बिबट नसबंदी करण्यात यावी, असा देशातील पहिला प्रस्ताव जुन्नर वन विभागाकडून जानेवारी2024 मध्ये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. त्याच्या मंजुरी करिता पाठपुरावा सुरू असल्याचे जुन्नरचे उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी स्पष्ट केले.

आर्टिफिशिल इंटेलिजन्स या तंत्राचा वापर करून मानवी वस्तीजवळ बिबट येईल तेव्हा कॅमेरे व अलार्म सिस्टीम राबवून सतर्क करण्यात येणार असल्याचा प्रादेशिक वन विभागातील राज्यातील पहिला प्रयोग जुन्नरमधे येत्या काही दिवसात राबविण्यात येणार आहे. बिबट समस्येकरिता स्पेशल प्रोटेक्शन फोर्स तयार करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आल्याची त्यांनी यावेळी सांगितले. मेंढपाळांकरिता तंबूची व्यवस्था करण्यात येत आहे.

### थ्री फेज वीजपुरवठा; मुजोर अधिकाऱ्यांची...

» विशेष बाब म्हणून जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर भागातील शेतीसाठी दिवसा थ्री फेज वीज पुरविण्यासाठी सरकारकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. मेंढपाळ व्यवसायिकांसाठी तंबू, बॅटरी आणि सोलर लाइटची व्यवस्था राज्य आपत्ती निवारण निधीतून करण्यात येणार आहे. तसेच मुजोर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात खात्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### बिबट्यांच्या वाढत्या संखेमुळे जागेची कमतरता...

» राज्यातल्या अनेक भागातील सध्या बिबट्याचा वावर पाहायला मिळतोय.. मात्र या पकडलेल्या बिबट्यांना ठेवण्यासाठी आणि त्यांना इजा झाल्यास त्यांच्यावर उपचार करण्यासाठी राज्यात एकच बिबट निवारा केंद्र आहे.. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील या केंद्रात जितक्या बिबटयांना ठेवण्याची क्षमता आहे त्याहून कितीतरी अधिक प्रमाणात बिबटे आढळत असल्याने या केंद्राच्या विस्तारीकरणाचा विचार असून त्यासाठी जलसंपदा विभागाकडे जागेची मागणी करण्यात आली आहे.

# विशाल अग्रवालचे डॉ तावरेंना दोन तासांत 14 कॉल

## अटक केलेले डॉ. तावरे आणि श्रीहरी लळनोर यांची पोलीस कोठडीची न्यायालयात मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील पोर्शे घटनेप्रकरणी सोमवारी ससून सामान्य रुग्णालयातील दोन डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली. अटकेच्या दुसऱ्या दिवशीमपोलिसांनी सांगितले की, हॉस्पिटलच्या फॉरेन्सिक मेडिसिन विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे यांनी अल्पवयीन मुलाच्या ब्लड सॅम्पल संकलनादरम्यान सुमारे दोन तासांत 14 वेळा अल्पवयीन मुलाच्या वडिलांशी फोनवर बोलले होते. यामुळे खळबळ माजली आहे. तसेच डॉ. अजय तावरे याचाच ब्लड रिपोर्ट बदल्याण्याचा मुख्य प्लॅन होता, अशी माहिती मिळाली आहे.

पोलिसांनी ब्लड रिपोर्टमध्ये फेरफार केल्याप्रकरणी अटक केलेले डॉ अजय तावरे आणि श्रीहरी लळनोर या दोघांच्या पोलीस कोठडीची न्यायालयात मागणी





### दोन तासांत 14 कॉल

» सरकारी डॉक्टरांना दोन तासांत कॉलवर कॉल केल्याचे स्पष्ट झाले. त्याने डॉक्टरवर दबाव टाकल्याचे दिसून येते. ब्लड सॅम्पल बदलल्याचा खुलासा पोलिसांनी केला होता. त्याची चौकशी करण्यासाठी मंगळवारी तीन सदस्यांची समिती गठित करण्यात आली आहे. समितीने ससून रुग्णालयाला भेट दिली. आता प्रकरणात एक खुलासा समोर आला आहे. अल्पवयीन आरोपीचा रक्त नमुना घेण्यापूर्वी डॉ. अजय तवारे आणि अल्पवयीन मुलाचे वडील आरोपी विशाल अग्रवाल यांच्यात दोन तासांत 14 व्हॉट्सअॅप कॉल झाल्याचे समोर आले आहे. हे कॉल सकाळी 8:30 ते 10:40 या दरम्यान करण्यात आले. सकाळी 11 वाजता आरोपीचा रक्त नमुना घेण्यात आला.

### सरकारी डॉक्टरांना बेड्या

» कल्याणीनगरमधील पोर्श कार अपघात 19 मे रोजी घडला. दुसऱ्या दिवशी आरोपीचा रक्त नमुना बदलल्याचा खुलासा पोलिसांनी केला होती. प्रकरणात सरकारी रुग्णालयातील न्यायवैद्यक शास्त्र विभागातील मुख्य डॉक्टर अजय तवारे आणि डॉ. श्रीहरी हळनोर, अतुल घाटकांबळे यांना अटक करण्यात आली आहे. पैशांच्या बदल्यात रक्त नमुना बदल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. अल्पवयीन मुलाने दारुचे सेवन न केल्याचे सिद्ध करण्यासाठी हा खटाटोप करण्यात आला होता.

केली. ब्लड रिपोर्टमध्ये फेरफार करण्यासाठी लाच घेतल्याचे आढळले असल्याचे पोलिसांनी सांगितले. अल्कोहोलची उपस्थिती दर्शवनारा अल्पवयीन मुलाचे ब्लड सॅम्पल कचऱ्यात टाकले. आणि त्याच्या जागी दुसऱ्या व्यक्तीच्या रक्ताचा नमुना तपासण्यासाठी पाठवण्यात आला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांनी डॉ. तावरे, डॉ. श्रीहरी हळनोर, अपघाती वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णालयातील शवागारात काम करणारे अतुल घाटकांबळे यांच्याशी संबंधित परिसराची झडती घेतली. त्यांच्याकडून डॉ हळनोर यांच्याकडून अडीच लाख रुपये आणि घाटकांबळे यांच्याकडून 50 हजार रुपये जप्त करण्यात आले.

तपासाचे मुख्य केंद्र आता डॉ तावरे यांचे आर्थिक व्यवहार आहे, त्यांना किती पैसे मिळाले किंवा कोणाकडून आश्वासन दिले गेले, याचा तपास सुरु असल्याते, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.